# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** कराड शहर **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0657 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/12/2020 21:41 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 29/10/2020
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/10/2020
**Time From (वेळेपासून):** 12:54 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/12/2020 **Time (वेळ):** 21:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 075 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/12/2020 21:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 3 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उप प्रादेशीक परिवहन अधीकारी का,कराड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
a) **Name (नाव):** मनोजकुमार मोहन कुंभार
b) **Father's Name (वडील चे नाव) :** मोहन
c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बाजार पेठ, काले, ता कराड, जि,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बाजार पेठ, काले, ता कराड, जि,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9607774390

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजु जाधव | | | 1. उप प्रादेशीक परिवहन अधीकारी , कार्यालय कराड येथील एजंट,कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10. **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्कुवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब ता.09/12/2020 मी मनोजकुमार मोहन कुंभार, वय.30 वर्षे, व्यवसाय- खाजगी नोकरी रा. बाजार पेठ, काले, ता. कराड, जि. सातारा मोबाईल नंबर. 9607774390. मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहण्यास आहे. मी माहे फेब्रुवारी 2020 मध्ये प्रणवराज होंडा कासेगांव या शोरुम मधून बी.एस.4 अँक्टीव्हा फायजी ही मोपेड मोटर सायकल खरेदी केली आहे. मला शोरुमकडून मार्च 31 चे अगोदर मोटर सायकल पासींग करुन घेणे बाबत सांगीतले होते, परंतु कोरोना साथीच्या प्रभावामुळे संचारबंदी असल्याने मला गाडीची नोंदणी करणे करीता आरटीओ ऑफीस कराड येथे जाणेचे झाले नाही. लकडाऊन संपल्यानंतर मी शोरुमशी संपर्क साधून गाडीचे पासींग बाबत विचारणा केली असता, तेथे मला बी.एस.4 गाड्यांचे पासींग बाबत कोर्टात केस चालु आहे. त्याचा निकाल लागले नंतर गाडी पासींग होईल् असे सांगीतले. त्यानंतर मी दि.05.10.2020 रोजी शोरुममध्ये चौकशी केली असता तेथे मला समजले की, बी.एस.4 गाड्यांचे पासिंग करीता 30 ऑक्टोबर पर्यत मुदत देण्यात आली आहे. तुम्ही आरटीओ कार्यालय कराडशी संपर्क साधा असे सांगीतल्याने मी आरटीओ कार्यालय कराड येथील सहा. मोटार वाहन निरीक्षक श्री देसाई साहेब यांना संपर्क करुन गाडीचे पासींग बाबत चर्चा केली असता त्यांनी मला गाडीची कागदपत्र घेवुन ऑफीसमध्ये येवुन भेटण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी आरटीओ कार्यालय कराड येथे जावुन श्री देसाई साहेब यांची भेट घेतली असता सदर ऑफीसमध्ये हजर असलेले विभुते एजंट यांना देसाई साहेबांनी यांचे काय आहे ते बघून घ्या असे सांगून त्यांना हाताची पाच बोटे दाखवली. त्यावेळी विभुते यांनी मला बाहेर जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी बाहेर जावुन थांबलो. त्यानंतर काही वेळातच विभुते एजंट हे बाहेर आले. मी त्यांना देसाई साहेब काय म्हणाले या बाबत विचारणा केली असता त्यांनी गाडीचे पासींग करीता 5000/- रुपये मागीतले आहेत असे सांगीतल्याने मी देसाई साहेब यांना पुन्हा भेटुन गाडीचे पासींग बाबत चर्चा केली असता ते मी विभुते एजंट यांना सांगीतले आहे. तुमच्या गाडीचे पासींग होवुन जाईल असे म्हणाले. त्यानंतर मी तेथून बाहेर येवुन पुन्हा विभुते एजंट यांची भेट घेतली असता, त्यांनी सातारा आरटीओ ऑफीस येथील राऊत साहेब यांची गाडीचे कागदपत्रांवर सही घेवुन या राऊत साहेबांची गाडीचे कागदपत्रावर सही झाल्यानंतर तुम्हाला देसाई साहेब यांना पैसे द्यावे लागणार नाहीत. एजंट विभुते यांनी सांगीतल्याप्रमाणे मी सातारा आरटीओ ऑफीस येथे जावुन राऊत साहेब यांची भेट घेवुन मी खरेदी केलेल्या मोटर सायकलचे कागदपत्रांवर त्यांचा रिमार्क घेतला व कराडमध्ये येवुन विभुते एजंट याची भेट घेवुन त्यांना मोटर सायकलची कागदपत्र दाखवली असता ते मी तुला आयडीया दिल्यामुळे देसाई साहेब माझेवर चिडतील त्यामुळे मी तुला दुसरा एजंट जोडून देतो असे सांगीतले. त्यानंतर एजंट विभुते यांनी माझी एजंट जाधव यांचेशी ओळख करुन दिली. त्यानंतर एजंट जाधव व मी असे दोघे देसाई साहेब बसतात त्या ठिकाणी गेलो व देसाई साहेबांना राऊत साहेबांची सही झालेली कागदपत्र दाखवली असता देसाई साहेबांनी एजंट जाधव यांना यांचा सीआरटीएम काढून घ्या, ऑनलाईमध्ये बसले तर गाडी पासींग होईल अन्यथा मी काही करु शकत नाही असे म्हणाले त्यावेळी एजंट जाधव हा देसाई साहेबांना काम मार्च मधील आहे ऑनलाईनमध्ये बसून जाईल असा म्हणाला.



Scanned with CamScanner

त्यावेळी देसाई साहेबांनी गाडीचे पासींग करीता 5000/- रुपये द्यावे लागतील असे जाधव एजंट यांना सांगीतले. मी देसाई साहेब यांना पैसे कमी करणे बाबत विनंती केली परंतु त्यांनी ते काही होणार नाही तुम्हाला मला 5000/- रुपये द्यावे लागतील असे ते म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पैश्याची जुळणी झाल्यानंतर तुम्हाला 5,000/- रुपये आणून देतो असे नाईलाजाने म्हणालो. श्री देसाई साहेब, सहा. मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालय कराड हे माझ्याकडून 5,000/-रुपये घेतल्याशिवाय मी खरेदी केलेल्या होंडा कंपनीच्या अँक्टीव्हा फाय जी या मोटर सायकलचे पासींग करणार नाहीत, अशी माझी खात्री झाल्याने व मला सहा. मोटार वाहन निरीक्षक श्री देसाई साहेब यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि.28.10.2020 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयास संपर्क करुन श्री घाटगे साहेब यांना माझी श्री देसाई सहा. मोटार वाहन निरीक्षक उप प्रादेशीक परिवहन कार्यालय कराड यांचे विरुध्द लाच मागणी केले बाबतची तक्रार असले बाबत कळवले होते. त्यावेळी घाटगे साहेबांनी मला मा. पोलीस उपायुक्त / पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो पुणे यांची परवानगी घेवुन तुम्हाला कळवितो असे सांगीतले. त्यानंतर काही वेळातच घाटगे साहेबांनी मा. पोलीस उपायुक्त / पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो पुणे यांची तोंडी परवानगी घेवुन सदर कारवाई करणे करीता सांगली युनिटकडील पोलीस निरीक्षक श्री गुरुदत्त मोरे यांना प्राधीकृत केले असुन पुढील कारवाई करीता ते तुमच्याशी संपर्क करीतील असे सांगीतले. त्यानंतर काही वेळातच मोरे साहेबांनी माझेशी संपर्क करुन माहीती घेवुन त्यांनी कासेगांव येथे येत असले बाबत सांगीतले. त्यावेळी मी त्यांना एन.एच. 4 हायवेच्या पश्चिम बाजुस हटेल खाऊगल्लीचे पाठीमागे असले मनालीज इन्स्टीटयुट ऑफ हटेल मनेजमेंट या कलेज जवळ येण्यास सांगलीतले. त्या प्रमाणे मोरे साहेब व त्यांचा स्टाफ असे सुमारे 13.00 वा.चे सुमारास मनालीज इन्स्टीटयुट ऑफ हटेल मनेजमेंट या कलेजचे समोर आला. त्यावेळी मी मोरे साहेबांचे शासकीय टाटा सुमो जवळ जावुन मीच मनोजकुमार मोहन कुंभार असून मी सहा. मोटार वाहन निरीक्षक श्री देसाई साहेब यांचे विरुद्ध लाच मागणीची तक्रार असले बाबत कळविले होते अशी माझी ओळख करुन दिली. त्यानंतर मोरे साहेब यांनी दिले सुचने प्रमाणे त्यांना व त्यांचे सोबत असले इतर कर्मचारी यांना कलेजचे एका बंदीस्त खोलीत घेवुन गेलो. त्यानंतर मोरे साहेबांनी मला ब्युरोच्या कार्य प्रणाली बाबत माहीती देवुन मला माझा तक्रारी अर्ज देण्यास सांगीतला त्याप्रमाणे मी माझा तक्रारी अर्ज मोरे साहेब यांचे समक्ष हजर केला. त्यानंतर मोरे साहेबांनी माझी पंच साक्षीदार व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर मोरे साहेबांनी सदर कारवाईसाठी श्री. शार्दुल रघुनाथ जाधव यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. सुरेश चिंदू लोहार यांनी पंच नं. 2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.त्यानंतर मोरे साहेबांनी मला दिले सुचनेप्रमाणे मी माझी लाच मागणीची तक्रार थोडक्यात कथन केली. त्यानंतर मोरे साहेबांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचानी तक्रारी अर्ज वाचून मी, तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे सांगीतले. त्यानंतर सदर तक्रारी अर्ज वाचलेबाबत तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सहा केल्या.त्यानंतर मोरे साहेब, सापळा पथक व दोन्ही पंच असे कलेजचे बंदीस्त खोलीमधून बाहेर येवुन शासकीय टाटा सुमो जवळ आलो. मोरे साहेबांनी मला व पंच जाधव यांना माझेकडील मोटर सायकल वरुन रवाना होऊन पाटण रोडला असले उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालयाचे अलीकडे कराड कडील बाजुस 1 किमी अंतरावर थांबणेस सांगीतले. त्याप्रमाणे मी व पंच जाधव असे माझेकडील मोटर सायकलने रवाना होवुन उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालयाचे अलीकडे कराड कडील बाजुस 1 किमी अंतराव दाखल झालो. आमचे पाठोपाठच मोरे साहेब व पथक आम्ही थांबलो त्या ठिकाणी दाखल झाले. त्यानंतर मोरे साहेबांनी मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकर्डर व नवीन मेमरी कार्ड बाबत माहिती देवून पडताळणी कामी मला व पंच जाधव यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकडे दिला. तो मी माझे अंगावरील पन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर मला व पंच जाधव यांना मोरे साहेब यांनी लोकसेवक श्री देसाई सहा. मोटार वाहन निरीक्षक यांची त्यांचे कार्यालयात जावून भेट घेण्यास जाणेकरीता रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच श्री. जाधव असे माझेकडील होंडा कंपनीचे नवीन अँक्टीव्हा फाय जी कंपनीचे मोटर सायकल तात्पुरता क्रमांक एम.एच.10. टी.सी. 1055 वरून रवाना होवून उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालय कराडचे समोरे गेलो सदर ठिकाणी असले पार्कींगमध्ये मी माझी मोटर सायकल पार्क केली व तेथून पायी चालत आरटीओ ऑफीसचे समोर असले एजंट जाधव यांचे ऑफीसमध्ये गेलो. जाधव हे ऑफीसमध्ये नसल्याने मी जाधव यांना माझे मोबाईल वरुन फोन लावुन माझे मोबाईलचा स्पिकर फोन केला असता जाधव यांनी मला जेवण करण्यासाठी घरी आलो आहे व साहेब हे कार्यक्रमात व्यस्त आहेत असे सांगीतले. त्यानंतर मी व पंच जाधव असे दोघांनी तेथील दुसरे एजंट विभुते यांची भेट घेतली. त्यावेळी विभुते हे मला साहेब डेरींगबाज आहेत कसले पण काम असुदे करतात त्यामुळे आम्ही पण त्यांना काम देत असतो असे म्हणाले. सदर ठिकाणी विभुते व आम्ही चहा घेतला व तेथून मी व पंच जाधव असे एजंट जाधव यांचे ऑफीस जवळ आलो. काही वेळातच जाधव हे त्यांचे ऑफीसमध्ये येवुन बसले. माझेत व एजंट जाधव यांचेत गाडीचे पासींग बाबत चर्चा झाली. त्यावर एजंट जाधव हे मला साहेबांना भेटुया आणि प्रोसीजर करुया असे म्हणाले व तेथून मी, पंच जाधव व एजंट जाधव असे पायी चालत उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालयातील श्री देसाई साहेब यांचे केबीनचे समोर आलो. त्यावेळी आरटीओ एजंट जाधव यांने देसाई साहेब हे कार्यक्रमातुन आले आहेत काय याची चौकशी केली. श्री देसाई साहेब हे अजुन कार्यक्रमातून आले नाहीत त्यांना यायला वेळ होणार आहे. तुम्हाला साहेबांनी उद्या बोलावले आहे. असे एजंट जाधव यांने मला सांगीतल्यामुळे मी व पंच जाधव असे तेथून बाहेर येवुन माझे नवीन अँक्टीव्हा फाय जी मोपेड मोटरसायकलीवरून उप प्रादेशीक परिहवन अधीकारी कराड येथून रवाना होऊन मोरे साहेब थांबले असले ठिकाणी गेलो. त्यावेळी मोरे साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकर्डर घेवून तो बंद करुन त्यांचे ताबेत घेतला. त्यानंतर मी व पंच श्री. जाधव यांनी मोरे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे घडलेली सविस्तर हकिगत सांगीतली. त्यानंतर मोरे साहेब, दोन्ही पंच व मी असे डिजीटल व्हाईस रेकर्डर मधील संभाषण एकून खात्री करून घेतली. त्यानंतर मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डरमधील सर्व संभाषणाच्या स्क्रिप्ट तयार केल्या.माझेत व एजंट जाधव यांचेत झाले संभाषणामध्ये एजंट जाधव यांनी देसाई साहेब हे कार्यक्रमात व्यस्त आहेत त्यांनी भेट घेणे करीता दि.29.10.2020 रोजी येण्याचे सांगीतले असल्यामुळे मोरे साहेब यांनी दि.29.10.2020 रोजी लाच रक्कम मागणी बाबत श्री देसाई साहेब यांचा सहभाग निष्पन्न करुन घेणे करीता त्यांची भेट घेणेकामी दि.29.10.2020 रोजी पुन्हा रवाना करण्याचे मोरे साहेबांनी ठरवले. त्यानंतर त्या ठिकाणची कार्यवाही पुर्ण झाले नंतर मोरे साहेब यांनी मला दि.29.10.2020 रोजी मनालीज इन्स्टीटयुट ऑफ हटेल मनेजमेंट या कलेजमध्ये दुपारी 12.00 वाजता उपस्थित राहणे बाबत सुचना दिल्या व मोरे साहेब, सापळा पथक व पंच असे शासकीय टाटा सुमोने सांगलीस निघून गेले. त्यानंतर दि.29.10.2020 रोजी मोरे साहेब, त्यांचा स्टाफ व दोन्ही पंच असे शासकीय टाटा सुमोने मनालीज इन्स्टीटयुट ऑफ हटेल मनेजमेंट कासेगांव या कलेजचे समोर दाखल झाले. तेथे मोरे साहेब व माझी भेट झाली. सदर ठिकाणी मोरे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी व पंच जाधव असे माझेकडील नवीन अँक्टीव्हा फाय जी मोपेड मोटर सायकल तात्पुरता क्र एम.एच.10. टी.सी. 1055 ने उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालयाचे अलीकडे कराड कडील बाजुस एक किमी अंतरावर पाटण रोडला रवाना झालो. पाठोपाठ सापळा पथक व दुसरे पंच असे शासकीय टाटा सुमोने रवाना झाले. असे आम्ही सर्वजण उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालयाचे अलीकडे कराड कडील बाजूस 1 किमी अंतरावर पाटण रोडला दाखल झालो. सदर ठिकाणी आम्ही आमचे ताबेतील वाहने रोडचे डावे बाजुस पार्क केली मोरे साहेबांनी मला व पंच जाधव यांना टाटा सुमोमध्ये येवुन      वर्दी जबाब ता.09/12/2020

मी मनोजकुमार मोहन कुंभार, वय.30 वर्षे, व्यवसाय- खाजगी नोकरी रा. बाजार पेठ, काले, ता. कराड, जि. सातारा मोबाईल नंबर. 9607774390.



Scanned with CamScanner

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहण्यास आहे. मी माहे फेब्रुवारी 2020 मध्ये प्रणवराज होंडा कासेगांव या शोरुम मधून बी.एस.4 अँक्टीव्हा फायजी ही मोपेड मोटर सायकल खरेदी केली आहे.  मला शोरुमकडून मार्च 31 चे अगोदर मोटर सायकल पासींग करुन घेणे बाबत सांगीतले होते, परंतु कोरोना साथीच्या प्रभावामुळे संचारबंदी असल्याने मला गाडीची नोंदणी करणे करीता आरटीओ ऑफीस कराड येथे जाणेचे झाले नाही. लॉकडाऊन संपल्यानंतर मी शोरुमशी संपर्क साधून गाडीचे पासींग बाबत विचारणा केली असता, तेथे मला बी.एस.4 गाड्यांचे पासींग बाबत कोर्टात केस चालु आहे. त्याचा निकाल लागले नंतर गाडी पासींग होईल् असे सांगीतले. त्यानंतर मी दि.05.10.2020 रोजी शोरुममध्ये चौकशी केली असता तेथे मला समजले की, बी.एस.4 गाड्यांचे पासिंग करीता 30 ऑक्टोबर पर्यंत मुदत देण्यात आली आहे. तुम्ही आरटीओ कार्यालय कराडशी संपर्क साधा असे सांगीतल्याने मी आरटीओ कार्यालय कराड येथील सहा. मोटार वाहन निरीक्षक श्री देसाई साहेब यांना संपर्क करुन गाडीचे पासींग बाबत चर्चा केली असता त्यांनी मला गाडीची कागदपत्र घेवुन ऑफीसमध्ये येवुन भेटण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी आरटीओ कार्यालय कराड येथे जावुन श्री देसाई साहेब यांची भेट घेतली असता सदर ऑफीसमध्ये हजर असलेले विभुते एजंट यांना देसाई साहेबांनी "यांचे काय आहे ते बघून घ्या" असे सांगून त्यांना हाताची पाच बोटे दाखवली. त्यावेळी विभुते यांनी मला बाहेर जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी बाहेर जावुन थांबलो. त्यानंतर काही वेळातच विभुते एजंट हे बाहेर आले. मी त्यांना देसाई साहेब काय म्हणाले या बाबत विचारणा केली असता त्यांनी गाडीचे पासींग करीता 5000/- रुपये मागीतले आहेत असे सांगीतल्याने मी देसाई साहेब यांना पुन्हा भेटुन गाडीचे पासींग बाबत चर्चा केली असता ते "मी विभुते एजंट यांना सांगीतले आहे. तुमच्या गाडीचे पासींग होवुन जाईल" असे म्हणाले. त्यानंतर मी तेथून बाहेर येवुन पुन्हा विभुते एजंट यांची भेट घेतली असता, त्यांनी सातारा आरटीओ ऑफीस येथील राऊत साहेब यांची गाडीचे कागदपत्रांवर सही घेवुन या राऊत साहेबांची गाडीचे कागदपत्रावर सही झाल्यानंतर तुम्हाला देसाई साहेब यांना पैसे द्यावे लागणार नाहीत. एजंट विभुते यांनी सांगीतल्याप्रमाणे मी सातारा आरटीओ ऑफीस येथे जावुन राऊत साहेब यांची भेट घेवुन मी खरेदी केलेल्या मोटर सायकलचे कागदपत्रांवर त्यांचा रिमार्क घेतला व कराडमध्ये येवुन विभुते एजंट याची भेट घेवुन त्यांना मोटर सायकलची कागदपत्र दाखवली असता ते मी तुला आयडीया दिल्यामुळे देसाई साहेब माझेवर चिडतील त्यामुळे मी तुला दुसरा एजंट जोडून देतो असे सांगीतले. त्यानंतर एजंट विभुते यांनी माझी एजंट जाधव यांचेशी ओळख करुन दिली. त्यानंतर एजंट जाधव व मी असे दोघे देसाई साहेब बसतात त्या ठिकाणी गेलो व देसाई साहेबांना राऊत साहेबांची सही झालेली कागदपत्र दाखवली असता देसाई साहेबांनी एजंट जाधव यांना "यांचा सीआरटीएम काढून घ्या, ऑनलाईमध्ये बसले तर गाडी पासींग होईल अन्यथा मी काही करु शकत नाही" असे म्हणाले त्यावेळी एजंट जाधव हा देसाई साहेबांना काम मार्च मधील आहे ऑनलाईनमध्ये बसून जाईल असा म्हणाला. त्यावेळी देसाई साहेबांनी गाडीचे पासींग करीता 5000/- रुपये द्यावे लागतील असे जाधव एजंट यांना सांगीतले. मी देसाई साहेब यांना पैसे कमी करणे बाबत विनंती केली परंतु त्यांनी ते काही होणार नाही तुम्हाला मला 5000/- रुपये द्यावे लागतील असे ते म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पैश्याची जुळणी झाल्यानंतर तुम्हाला 5,000/- रुपये आणून देतो असे नाईलाजाने म्हणालो. श्री देसाई साहेब, सहा. मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालय कराड हे माझ्याकडून 5,000/-रुपये घेतल्याशिवाय मी खरेदी केलेल्या होंडा कंपनीच्या अँक्टीव्हा फाय जी या मोटर सायकलचे पासींग करणार नाहीत, अशी माझी खात्री झाल्याने व मला सहा. मोटार वाहन निरीक्षक श्री देसाई साहेब यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि.28.10.2020 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयास संपर्क करुन श्री घाटगे साहेब यांना माझी श्री देसाई सहा. मोटार वाहन निरीक्षक उप प्रादेशीक परिवहन कार्यालय कराड यांचे विरुध्द लाच मागणी केले बाबतची तक्रार असले बाबत कळवले होते. त्यावेळी घाटगे साहेबांनी मला मा. पोलीस उपायुक्त / पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो पुणे यांची परवानगी घेवुन तुम्हाला कळवितो असे सांगीतले. त्यानंतर काही वेळातच घाटगे साहेबांनी मा. पोलीस उपायुक्त / पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो पुणे यांची तोंडी परवानगी घेवुन सदर कारवाई करणे करीता सांगली युनिटकडील पोलीस निरीक्षक श्री गुरुदत्त मोरे यांना प्राधीकृत केले असुन पुढील कारवाई करीता ते तुमच्याशी संपर्क करीतील असे सांगीतले. त्यानंतर काही वेळातच मोरे साहेबांनी माझेशी संपर्क करुन माहीती घेवुन त्यांनी कासेगांव येथे येत असले बाबत सांगीतले. त्यावेळी मी त्यांना एन.एच. 4 हायवेच्या पश्चिम बाजुस हॉटेल खाऊगल्लीचे पाठीमागे असले मनालीज इन्स्टीटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट या कॉलेज जवळ येण्यास सांगलीतले. त्या प्रमाणे मोरे साहेब व त्यांचा स्टाफ असे सुमारे 13.00 वा.चे सुमारास मनालीज इन्स्टीटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट या कॉलेजचे समोर आला. त्यावेळी मी मोरे साहेबांचे शासकीय टाटा सुमो जवळ जावुन मीच मनोजकुमार मोहन कुंभार असून मी सहा. मोटार वाहन निरीक्षक श्री देसाई साहेब यांचे विरुद लाच मागणीची तक्रार असले बाबत कळविले होते अशी माझी ओळख करुन दिली. त्यानंतर मोरे साहेब यांनी दिले सुचने प्रमाणे त्यांना व त्यांचे सोबत असले इतर कर्मचारी यांना कॉलेजचे एका बंदीस्त खोलीत घेवुन गेलो. त्यानंतर मोरे साहेबांनी मला ब्युरोच्या कार्य प्रणाली बाबत माहीती देवुन मला माझा तक्रारी अर्ज देण्यास सांगीतला त्याप्रमाणे मी माझा तक्रारी अर्ज मोरे साहेब यांचे समक्ष हजर केला. त्यानंतर मोरे साहेबांनी माझी पंच साक्षीदार व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर मोरे साहेबांनी सदर कारवाईसाठी श्री. शार्दुल रघुनाथ जाधव यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. सुरेश चिंदू लोहार यांनी पंच नं. 2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर मोरे साहेबांनी मला दिले सुचनेप्रमाणे मी माझी लाच मागणीची तक्रार थोडक्यात कथन केली. त्यानंतर मोरे साहेबांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचानी तक्रारी अर्ज वाचून मी, तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे सांगीतले. त्यानंतर सदर तक्रारी अर्ज वाचलेबाबत तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सहा केल्या.त्यानंतर मोरे साहेब, सापळा पथक व दोन्ही पंच असे कॉलेजचे बंदीस्त खोलीमधून बाहेर येवुन शासकीय टाटा सुमो जवळ आलो. मोरे साहेबांनी मला व पंच जाधव यांना माझेकडील मोटर सायकल वरुन रवाना होऊन पाटण रोडला असले उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालयाचे अलीकडे कराड कडील बाजुस 1 किमी अंतरावर थांबणेस सांगीतले. त्याप्रमाणे मी व पंच जाधव असे माझेकडील मोटर सायकलने रवाना होवुन उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालयाचे अलीकडे कराड कडील बाजुस 1 किमी अंतराव दाखल झालो. आमचे पाठोपाठच मोरे साहेब व पथक आम्ही थांबलो त्या ठिकाणी दाखल झाले. त्यानंतर मोरे साहेबांनी मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरी कार्ड बाबत माहिती देवून पडताळणी कामी मला व पंच जाधव यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझेकडे दिला. तो मी माझे अंगावरील पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर मला व पंच जाधव यांना मोरे साहेब यांनी लोकसेवक श्री देसाई सहा. मोटार वाहन निरीक्षक यांची त्यांचे कार्यालयात जावून भेट घेण्यास जाणेकरीता रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच श्री. जाधव असे माझेकडील होंडा कंपनीचे नवीन अँक्टीव्हा फाय जी कंपनीचे मोटर सायकल तात्पुरता क्रमांक एम.एच.10. टी.सी. 1055  वरून रवाना होवून उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालय कराडचे समोरे गेलो सदर ठिकाणी असले पार्कींगमध्ये मी माझी मोटर सायकल पार्क केली व तेथून पायी चालत आरटीओ ऑफीसचे समोर असले एजंट जाधव यांचे ऑफीसमध्ये गेलो. जाधव हे ऑफीसमध्ये नसल्याने मी जाधव यांना माझे मोबाईल वरुन फोन लावुन माझे मोबाईलचा स्पिकर फोन केला असता जाधव यांनी मला जेवण करण्यासाठी घरी आलो आहे व साहेब हे कार्यक्रमात व्यस्त आहेत असे सांगीतले. त्यानंतर मी व पंच जाधव असे दोघांनी तेथील दुसरे एजंट विभुते यांची भेट घेतली. त्यावेळी विभुते हे मला "साहेब डेरींगबाज आहेत कसले पण काम असुदे करतात त्यामुळे आम्ही पण त्यांना काम देत असतो" असे म्हणाले. सदर ठिकाणी विभुते व आम्ही चहा घेतला व तेथून मी व पंच जाधव असे एजंट जाधव यांचे ऑफीस जवळ आलो. काही वेळातच जाधव हे त्यांचे ऑफीसमध्ये येवुन



Scanned with CamScanner

बसले. माझेत व एजंट जाधव यांचेत गाडीचे पासींग बाबत चर्चा झाली. त्यावर एजंट जाधव हे मला "साहेबांना भेटुया आणि प्रोसीजर करुया" असे म्हणाले व तेथून मी, पंच जाधव व एजंट जाधव असे पायी चालत उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालयातील श्री देसाई साहेब यांचे केबीनचे समोर आलो. त्यावेळी आरटीओ एजंट जाधव यांने देसाई साहेब हे कार्यक्रमातुन आले आहेत काय याची चौकशी केली. श्री देसाई साहेब हे अजुन कार्यक्रमातून आले नाहीत त्यांना यायला वेळ होणार आहे. तुम्हाला साहेबांनी उद्या बोलावले आहे. असे एजंट जाधव यांने मला सांगीतल्यामुळे मी व पंच जाधव असे तेथून बाहेर येवुन माझे नवीन अॅक्टीव्हा फाय जी मोपेड मोटरसायकलीवरून उप प्रादेशीक परिहवन अधीकारी कराड येथून रवाना होऊन मोरे साहेब थांबले असले ठिकाणी गेलो. त्यावेळी मोरे साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून तो बंद करुन त्यांचे ताबेत घेतला. त्यांनतर मी व पंच श्री. जाधव यांनी मोरे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे घडलेली सविस्तर हकिगत सांगीतली. त्यानतर मोरे साहेब, दोन्ही पंच व मी असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण एकून खात्री करून घेतली. त्यानंतर मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील सर्व संभाषणाच्या स्क्रिप्ट तयार केल्या.माझेत व एजंट जाधव यांचेत झाले संभाषणामध्ये "एजंट जाधव यांनी देसाई साहेब हे कार्यक्रमात व्यस्त आहेत त्यांनी भेट घेणे करीता दि.29.10.2020 रोजी येण्याचे सांगीतले" असल्यामुळे मोरे साहेब यांनी दि. 29.10.2020 रोजी लाच रक्कम मागणी बाबत श्री देसाई साहेब यांचा सहभाग निष्पन्न करुन घेणे करीता त्यांची भेट घेणेकामी दि. 29.10.2020 रोजी पुन्हा रवाना करण्याचे मोरे साहेबांनी ठरवले. त्यानंतर त्या ठिकाणची कार्यवाही पुर्ण झाले नंतर मोरे साहेब यांनी मला दि. 29.10.2020 रोजी मनालीज इन्स्टीटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट या कॉलेजमध्ये दुपारी 12.00 वाजता उपस्थित राहणे बाबत सुचना दिल्या व मोरे साहेब, सापळा पथक व पंच असे शासकीय टाटा सुमोने सांगलीस निघून गेले. त्यानंतर दि.29.10.2020 रोजी मोरे साहेब, त्यांचा स्टाफ व दोन्ही पंच असे शासकीय टाटा सुमोने मनालीज इन्स्टीटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट कासेगांव या कॉलेजचे समोर दाखल झाले. तेथे मोरे साहेब व माझी भेट झाली. सदर ठिकाणी मोरे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी व पंच जाधव असे माझेकडील नवीन अॅक्टीव्हा फाय जी मोपेड मोटर सायकल तात्पुरता क्र एम.एच.10. टी.सी. 1055 ने उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालयाचे अलीकडे कराड कडील बाजुस एक किमी अंतरावर पाटण रोडला रवाना झालो. पाठोपाठ सापळा पथक व दुसरे पंच असे शासकीय टाटा सुमोने रवाना झाले. असे आम्ही सर्वजण उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालयाचे अलीकडे कराड कडील बाजूस 1 किमी अंतरावर पाटण रोडला दाखल झालो. सदर ठिकाणी आम्ही आमचे ताबेतील वाहने रोडचे डावे बाजुस पार्क केली मोरे साहेबांनी मला व पंच जाधव यांना टाटा सुमोमध्ये येवुन बसणे बाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी व पंच जाधव शासकीय टाटा सुमोमध्ये बसलो. त्यानंतर मोरे साहेब यांनी दि.28.10.2020 रोजी पडताळणी वेळी वापरलेले मेमरीकार्ड मला व पंचाना दाखवुन सदर मेमरी कार्ड डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये टाकले. त्यानंतर मोरे साहेबांनी मला व दोन्ही पंचाना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व मेमरीकार्ड बाबत पुन्हा माहिती दिली. त्यानंतर मोरे साहेब यांनी मला व पंच जाधव यांना पडताळणी कामी आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझेकडे दिला. मी तो माझे अंगावरील पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर मला मोरे साहेबांनी सहा. मोटार वाहन निरीक्षक श्री देसाई यांची भेट घेणेस रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच जाधव असे माझे नवीन अॅक्टीव्हा फाय जी मोपेड मोटर सायकल तात्पुरता क्र एम.एच.10. टी.सी. 1055 ने रवाना होवुन उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालय कराडचे समोर दाखल झालो. सदर ठिकाणी मी माझी मोटर सायकल पार्कीगमध्ये पार्क केली व सदर कार्यालयाचे समोरील बाजुस रोडचे पलीकडे असले जाधव एजंट यांचे ऑफीमसध्ये गेलो व त्यांची भेट घेवुन "साहेबांना भेटायला जायचे काय" असे विचारले असता" एजंट जाधव हे जावुया की असे म्हणाले. तेथून मी, पंच जाधव व एजंट जाधव असे पायी चालत सहा. मोटार वाहन निरीक्षक श्री देसाई साहेब यांचे केबीनमध्ये गेलो. देसाई साहेब यांना मी माझे मोटर सायकलची कागदपत्र दिली त्यांनी सदर कागदपत्रे बघीतली. त्यावर देसाई साहेब यांनी त्यांचे असिस्टंट पवार यांना गाडी चेक करुन घ्या असे सांगीतले. त्यानंतर तेथून मी, पंच जाधव, एजंट जाधव व असिस्टंट पवार असे कार्यालयाचे बाहेर गाडी जवळ आलो. पवार साहेब यांनी गाडीची तपासणी करुन गाडीचे कागदपत्रावर शेरा दिला. त्यानंतर तेथून आम्ही सर्वजण पुन्हा श्री देसाई साहेब यांचे केबीनमध्ये गेलो. देसाई साहेब यांनी माझे गाडीची कागदपत्र बघून त्यांचे जवळील संगणकावर गाडीची ऑनलाईन माहिती भरली व मला रोड टॅक्स भरणेस सांगीतला. मी रोड टॅक्स भरुन त्याची पावती गाडीचे कागदपत्रास जोडली. त्यानंतर साहेबांनी मला जाणेस सांगीतले. त्यानंतर मी व पंच जाधव असे तेथून बाहेर येवून थांबलो. काही वेळातच एजंट जाधव हे बाहेर आले, त्यावेळी जाधव हे मला म्हणाले तुम्ही काही टेन्शन घेवु नका, झालय पासिंग, वाचल पैसे तर वाचवायच का द्यायच तुम्ही सांगा, "द्या माझ्याकडे पाच हजार त्यांना सांगतो" आता पाचशे रुपये देवून जावा असे म्हणाले बर ठिक आहे असे म्हणून मी पंच जाधव असे उप प्रादेशीक परिहवन अधीकारी कार्यालयातून बाहेर येवुन माझे नवीन मोपेड मोटर सायकलने मोरे साहेब थांबले असले ठिकाणी आलो. मोरे साहेबांनी माझ्याकडून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवुन बंद करुन त्यांचे ताब्यात घेताला" त्यांनतर मी व पंच श्री. जाधव यांनी मोरे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे घडलेली सविस्तर हकिगत सांगीतली. त्यांनतर मोरे साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकीय टाटा सुमोने व मी माझेकडील नवीन मोपेड मोटर सायकलने थांबलो असले ठिकाणा वरुन रवाना होवुन मनालीज इन्स्टीटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट कासेगांव येथे दाखल झालो. त्यानंतर आम्ही कॉलेजच्या एका बंद खोलीत सदर ठिकाणी मोरे साहेब, दोन्ही पंच व मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण एकून खात्री करून घेतली. त्यानंतर मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील सर्व संभाषणाच्या स्क्रिप्ट तयार केल्या. एकंदरीत झाले संभाषणामध्ये श्री. देसाई, सहा. मोटार वाहन निरीक्षक यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली नाही परंतू आरटीओ एजंट श्री राजु जाधव यांनी मला "द्या माझ्याकडे पाच हजार त्यांना सांगतो" आता पाचशे रुपये देवून जावा असे संभाषण झालेची खात्री मोरे साहेब व दोन्ही पंचानी करून घेतली.त्यानंतर मी मोरे साहेब यांना "एजंट जाधव याचा माझे मोबाईलवर फोन आला होता. त्यांने सोमवारी साहेबांनी 4000/- रुपये आणुन द्यायला सांगीतले आहेत" असे सांगीतले. त्यानंतर मोरे साहेब यांनी दि.02.11.2020 रोजी सापळा कारवाई आयोजीत करण्याचे निश्चित केले. त्यानंतर मोरे साहेब यांनी मला दि.02.11.2020 रोजी सकाळी 11.00 वाजता मनालीज इन्स्टीटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट कासेगांव येथे हजर राहणेच्या सुचना देवुन ते व सापळा पथक व पंच असे शासकीय टाटा सुमोने सांगलीस निघून गेले. त्यानंतर दि. 02.11.2020 रोजी मोरे साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे शासकीय टाटा सुमोने मनालीज इन्स्टीटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट कासेगांव येथे दाखल झाले. त्यानंतर मोरे साहेब यांनी मला आरटीओ एजंट जाधव यांना वेळ व ठिकाण निश्चीत करणे करीता फोन करणे बाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी मोरे साहेब यांनी दिले सुचने प्रमाणे माझे मोबाईल वरुन आरटीओ एजंट जाधव यांना फोन करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेतला असता लागलीच मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन फोन जवळ धरला त्यावेळी आरटीओ एजंट जाधव हे मला " साहेब राहुदे म्हणटलेत, वाचलं आपलं, असे म्हणाले असता, त्यावर मी आरटीओ एजंट जाधव यांना कशामुळे साहेब नको म्हणटलेत त्यावर एजंट जाधव यांने काम होतय म्हणटल्यावर कशाला म्हणटंले, त्यावर मी आरटीओ एजंट जाधव यांना काम एवढे दिवस कशाला आडवून धरलं होतं असे विचारले असता, आरटीओ एजंट जाधव यांनी मला त्यांना वाटलं काम व्हायच नाही असुदे घ्या तेवढंच वाचल आपल असे म्हणाले. त्यावर मी आरटीओ एजंट जाधव यांना तुम्हाला काय, तुमचा विषय काय असे विचारले असता आरटीओ एजंट जाधव यांनी मला, राहुद्या आता असे म्हणाले. त्यावर मी बरं असे म्हणून मोबाईल कॉल कट केला." त्यानंतर लागलीच मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर मोरे साहेब यांनी पंचासमक्ष वेळ व ठिकाण निश्चित करणे करीता आरटीओ एजंट जाधव यांनी साहेब राहुदे म्हणटलेत असे म्हणुन पैसे



Scanned with CamScanner

घेवुन येण्यास नकार दिला, परंतु दि.29.10.2020 रोजी आरटीओ एजंट जाधव यांने माझेकडे 5000/- रुपये मागीतलेने श्री. मोरे साहेब यांनी सदर कारवाई बाबत वरिष्ठ कार्यालयास अहवाल पाठवित असल्याबाबत मला कळवले होते. आज दि.09.12.2020 रोजी मा. श्री. मोरे पोलीस निरीक्षक सो, एसीबी सांगली यांनी मला संपर्क करून आरटीओ एजंट राजु जाधव यांचेविरूध्द गुन्हा दाखल करण्याबाबत वरिष्ठ कार्यालयातून परवानगी प्राप्त झाली असल्याचे कळवले.मी दिले तक्रारी अर्जा वरुन श्री मोरे पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो सांगली यांनी माझ्या तक्रारी अर्जाची पडताळणी केली असून दि.29.10.2020 रोजी आरटीओ एजंट जाधय यांनी माझ्याकडे 5000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. त्यानंतर दि.02.11.2020 रोजी श्री मोरे साहेब यांनी सापळा कारवाई आयोजित केली असता सदर सापळा कारवाई दरम्यान आरटीओ एजंट जाधव यांनी 5000/- रुपये लाचेची रक्कम घेण्यास नकार दिला आहे. परंतु दि.29.10.2020 रोजीचे पडताळणीचे वेळी आरटीओ एजंट राजु जाधव खाजगी इसम यांनी मला मी खरेदी केलेल्या नवीन अँवटीव्हा फायजी मोपेड मोटर सायकलचे पार्सीग करुन देणे करीता 5000/- रुपये द्या असे सांगून सहा.मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कराड यांचे करीता माझ्याकडे लाच मागणी केल्याने माझी कराड उप प्रादेशीक परिवहन अधीकारी कार्यालय कराड येथील राजु जाधव, आरटीओ एजंट यांचेविरुध्द फिर्याद आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

12.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** **(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Bhagwan RAMCHNDRA PATIL(I (Inspector)) / PSMH26077 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

13. **District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Kumbhar

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Bhagwan RAMCHNDRA PATIL

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PSMH26077

(A.K. Madane)

पोलीस स्टेशन ऑफीसर
कराड शहर पो. ठाणे, जि. सातारा
दि. 09/12/2020



Scanned with CamScanner